श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

जून २०२२ | वर्ष – १०, अंक – ७ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४

## जनुकीय प्रयोगशाळेचा लोकार्पण सोहळा

डेरवण रुग्णालयात जनुकीय प्रयोशाळेचा (Genomic Laboratory) लोकार्पण सोहळा संस्थेचे विश्वस्थ व प्रेरणास्थान श्री. अशोकराव जोशी यांच्या शुभ हस्ते तसेच प्रमुख विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांच्यासह वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. ऋता मुल्हेरकर, डॉ. नीलम शिरसाट, वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील आणि वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. विजय डोम्बले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.




*श्री. अशोकराव जोशी यांच्या हस्ते जनुकीय प्रयोगशाळेचे उद्घाटन, सोबत श्री. विकासराव वालावलकर, डॉ. ऋता मुल्हेरकर इत्यादी*

या उद्घाटन सोहळ्याला डॉ. मैत्रा (विभागप्रमुख, शरीरक्रियाशास्त्र), डॉ. नेताजी पाटील (प्राध्यापक, रेडिओलॉजी विभाग), डॉ. अविनाश वाघमोडे (विभाग प्रमुख, फोरेन्सिक मेडिसिन), डॉ. सुनीता पाटील (विभागप्रमुख, फार्माकॉलॉजी), डॉ. रामबदन चौहान (प्राध्यापक, पी. एस. एम. विभाग), डॉ. प्रशांत मूल्या (सहयोगी प्राध्यापक, शरीररचना विभाग), डॉ. राहुल चोपडे (सहयोगी प्राध्यापक, पी. एस. एम. विभाग), डॉ. जयश्री (सहयोगी प्राध्यापक, जीवरसायनशास्त्र), डॉ. देशपांडे (विभागप्रमुख, पॅथॉलॉजी), डॉ. संतपूर (विभागप्रमुख, प्रसूतिशास्त्र व स्त्रीरोग), आणि डॉ. योगेंद्र शेळके (सहयोगी प्राध्यापक, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग) आवर्जून उपस्थित होते. संस्थेतील अन्य कार्यालयीन कर्मचारी व मान्यवरांपैकी श्री. गौतम तेंडुलकर, श्री. गोडबोले, श्री. मुकुंद मुणगेकर, श्री. स्वप्नील क्षीरसागर, श्री. देशमुख तसेच महाविद्यालयातील प्रयोगशाळातंत्रज्ञ सौ. सुजाता कोरचीकर, श्री. अजित नांदोस्कर आदी प्राधान्याने उपस्थित होते.

या जनुकीय प्रयोगशाळेचा कार्यभार समर्थपणे सांभाळणाऱ्या डॉ. नीलम शिरसाट (निवृत्त शास्त्रज्ञ, टाटा मेमोरिअल सेंटर) यांनी उपस्थित मान्यवरांना जनुकीय प्रयोगशाळेच्या कार्यप्रणालीविषयी माहिती दिली.

जगाला तसेच भारताला भेडसावणाऱ्या कर्करोगासारख्या दुर्धर आजाराचे वेळेआधी निदान करण्याचे ध्येय समोर ठेवून या प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली आहे. डेरवण रुग्णालय हे वर्षानुवर्ष ग्रामीण व दुर्गम भागातील स्त्रियांच्या आरोग्याविषयी विविध समस्यांचे निराकरण कारण्यासाठी अहोरात्र कष्ट घेत असून विविध आरोग्यविषयक योजना राबवत आहे. त्याचाच भाग असलेल्या योजनेत किशोरवयीन मुलींच्या शरीरातील विविध अत्यावशक खनिजे, प्रथिने, कॅल्शिअम, हिमोग्लोबीन यांचे प्रमाण अभ्यासून भविष्यात त्यांच्या कमतरतेमुळे होणारे आजार टाळण्यासाठी वेळीच सल्ला व औषधोपचार करण्यात येतात. हा अभ्यास करताना काही अत्यावश्यक घटक हे प्रामुख्याने जनुकीय संरचनेतील बदलामुळे (Gene Polymorphism) झाले असल्याचे आढळून आले आहे. नव्याने सुरू करण्यात आलेली जनुकीय प्रयोगशाळा या जनुकीय संरचनेतील बदलांवर अधिक संशोधन करून त्यावर मात करणारी उपचारप्रणाली शोधण्यास नक्कीच महत्त्वाची भूमिका पार पाडेल असे मत डॉ. नीलम शिरसाट यांनी मांडले. डेरवण रुग्णालय व महाविद्यालयाच्या ग्रामीण व दुर्गम कार्यक्षेत्रातील स्त्रियांमधील स्तनाचा कर्करोग व गर्भपिशवी तसेच स्त्रीबीज तयार करणाऱ्या बीजकोषाच्या कर्करोगाची जनुकीय कारणं शोधण्यासाठी सध्या या जनुकीय प्रयोगशाळेचा वापर होणार असून जनुकीय संरचनेतील संभाव्य बदल वेळेआधी ओळखून या कर्करोगाचे लवकर निदान करण्यास त्याने मदत होईल असे मतं त्यांनी मांडले .

या जनुकीय प्रयोगशाळेच्या जडणघडणीत व स्थापनेसाठी आवश्यक ती सर्व मदत करणाऱ्या संस्थेचे प्रमुख विश्वस्त माननीय श्री. विकासराव वालावलकर तसेच प्रख्यात कर्करोगतज्ज्ञ डॉ. श्रीपाद

बाणावली (Director - Academics, टाटा मेमोरियल हॉस्पिटल), शस्त्रक्रिया विभागाचे प्रमुख डॉ. अभय देसाई, महाविद्यालयाचे डीन व अध्यापक (पॅथॉलॉजी) डॉ. विजय डोम्बले व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रसन्ना नकाते या सर्वांचे त्यानी आभार मानले.

समारोप करताना प्रमुख विश्वस्त मा. श्री. अशोकराव जोशी यांनी जनुकीय प्रयोगशाळा ही यशस्वीपणे निश्चित केलेले ध्येय गाठेल व भविष्यात रुग्णालय व महाविद्यालयाच्या ग्रामीण व दुर्गम कार्यक्षेत्रातील गरजवंतांसाठी एक वरदान ठरेल असे मत मांडले व पुढील वाटचालीसाठी आशीर्वादरूपी शुभेच्छा दिल्या.



# ‘ज्ञानप्रबोधिनी’च्या तज्ज्ञांची रुग्णालयाला भेट

ज्ञान प्रबोधिनी (पुणे)च्या मानसशास्त्र संस्थेच्या संचालिका, डॉ. अनघा लवळेकर, सी.एस.आर. सेल प्रमुख डॉ. सुमेधा कुलकर्णी, आणि डॉ. दीपक गुप्ते यांनी गुरुवार, दि. २ जून २०२२ रोजी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाला भेट दिली. डॉ. अनघा लवळेकर यांनी मानसशास्त्र क्षेत्रातील जीवनाच्या गुणवत्तेवर आधारित पूर्व आणि पाश्चिमात्य दृष्टिकोनाचे एकत्रीकरण करण्याच्या उद्देशाने सामाजिक मानसशास्त्रातील क्लिनिकल आणि



*डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. अनघा लवळेकर, डॉ दीपक गुप्ते, डॉ सुमेधा कुलकर्णी, सौ. शरयु यशवंतराव, श्री. अशोकराव जोशी आणि श्री. विकासराव वालावलकर*

डॉक्टरेट व्यवसायातील विविध उपक्रमांद्वारे सकारात्मक मानसिक आरोग्याच्या मार्गाचा अभ्यास करून, संशोधन आणि शैक्षणिक क्षेत्रात योगदान दिले आहे.

वालावलकर रुग्णालयाचे विश्वस्त श्री. अशोकराव जोशी आणि श्री. विकासराव वालावलकर, डॉ. सुवर्णा पाटील (मेडिकल डायरेक्टर), डॉ. नेताजी पाटील (रेडिऑलॉजीस्ट), शरयू यशवंतराव (स्कूल डायरेक्टर) यांनी त्यांच्याबरोबर या निमित्ताने सुसंवाद साधला.

‘संवादिनी’ (समरसता) शीर्षक असलेल्या ज्ञानप्रबोधिनीच्या महिला विभागाचे नेतृत्व त्या करतात. ‘रचनात्मक सामाजिक बदलासाठी आत्मविकास’ हे ब्रीदवाक्य घेऊन त्या कार्यरत आहेत. महिलांना त्यांच्या हक्कांसाठी सक्षम करणे, किशोरवयीन मुलांना त्यांच्या लैंगिकतेची आणि संबंधित जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणे, सामाजिक, आर्थिकदृष्ट्या वंचित असलेल्या मुलांना मदत करणे, अनौपचारिक शिक्षण आणि कौटुंबिक समुपदेशनकक्षाद्वारे नातेसंबंध वाढवणे असे त्यांच्या कामाचे स्वरूप आहे

# ग्रीष्मकालीन आंतरवासीयता कार्यक्रम

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/शैक्षणिक संस्थेमधील विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठामार्फत शैक्षणिक वर्ष २०२२ करिता आयोजित Summer Internship Program (SIP) ग्रीष्मकालीन आंतरवासीयता कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थचे प्राचार्य डॉ. विजय डोंबले (प्राध्यापक, पॅथॉलॉजी), मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील (एम.डी. मेडिसिन) ह्यांच्या हस्ते झाले. प्रा. डॉ. रामबदन चौहान व डॉ. रविकिरण कामटे (असोसिएट प्रोफेसर) (रिसर्च मेथडॉलॉजी, सोशल कमिटमेन्ट), डॉ. रिता मुल्हेरकर व डॉ. योगेंद्र शेळके (मॉलिक्युलर बायोलॉजी), डॉ. आदित्य पावनकुमार




*मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील, सहभागी विद्यार्थ्यांना संबोधित करताना*

(मेडिकल ऑन्कॉलॉजी, टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई), रोहन गुप्ते (बायोमेडिकल इन्स्ट्रुमेन्टेशन) आणि प्रज्ञा गोखले (इंजिनीअर) इत्यादी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. कोल्हापूर, धुळे, जळगाव, नागपूर, मुंबई, सिंधुदुर्ग, शिवाय महाराष्ट्राबाहेरच्याही एम.बी.बी.एस. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भ.क.ल. वालावलकर रूरल मेडिकल कॉलजमध्ये या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. ग्रीष्मकालीन आंतरवासीयता कार्यक्रमाचा कालावधी २४ मे ते ७ जून असा दोन आठवड्यांचा होता.




*मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. ऋता मुल्हेरकर आणि सहभागी विद्यार्थी*

# किशोरावस्था एक रोमांचक सफर कार्यशाळा

आयुष्य जगत असताना काही जीवनावश्यक कौशल्य आवश्यक असतात. म्हणजेच जीवनावश्यक कौशल्य ही प्रत्येक मानवाची गरज आहे. या कौशल्यमुळे आपल्या क्षमतांची जाणीव आपल्याला होते. तसेच आपल्या जीवनातील अपयशासाठी इतरांना दोषी ठरविले जात नाही. कारण प्रत्येक समस्येचे उत्तर शोधण्याची क्षमता यातून विकसित होते. तसेच आधुनिकीकरणाने भारावलेल्या समाजाला जीवन कौशल्ये आवश्यकता आहे. तसेच किशोरांसाठी तर ही कौशल्ये फार गरजेची आहेत. कारण किशोर वय हे जीवनातील फार महत्त्वाचा टप्पा आहे. त्यामुळे त्यांना या महत्त्वाच्या टप्प्यावर जर जीवनावश्यक कौशल्ये शिकवली गेली तर त्यांच्या जीवनामध्ये चांगले बदल होऊ शकतात. त्यामुळे १२/०६/२०२२ रोजी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात जीवनावश्यक कौशल्य ही कार्यशाळा डॉ. वैशाली देशमुख (दीनानाथ हॉस्पिटल) या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कार्यशाळेचा कोंड कारूळ, कोंड बुधल आणि निवळी या गावातील ५२ किशोरींनी लाभ घेतला. या कार्यशाळेत जीवनावश्यक कौशल्य म्हणजे काय? तणाव व भावना नियोजन, स्व-ओळख, सह-अनुभूती, सुसंवाद, नातेसंबध, कल्पक विचार आणि सारासार विचार आणि निर्णय क्षमता या प्रकारच्या जीवनावश्यक कौशल्यांचे मार्गदर्शन मुलींना लाभले.



# नैसर्गिक सौंदर्य प्रसाधने तयार करण्याची कार्यशाळा

त्वचा रोग तज्ञ डॉ. अनघा संत आणि डेरवण कोहार्ट टीम यांच्या मार्गदर्शनाखाली बी आणि बियाणे वापरून नैसर्गिक सौंदर्य प्रसाधने तयार करण्याची कार्यशाळा डेरवण रुग्णालयात ११ जुन २०२२ ला घेण्यात आली. (उदा. आवळा, कोकम, कंडुलिब इत्यादी)



# वृक्षारोपण

शनिवार, दि. १० जून २०२२ रोजी भ.क.ल. वालावलकर रूरल मेडिकल कॉलेजमध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा वर्धापन दिन व वृक्षारोपणचा कार्यक्रम उत्तमरीत्या पार पडला. सकाळी ०९.४५ वाजता ध्वजारोहण वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. विजय डोम्बले



भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

यांचे हस्ते झाले. विद्यापीठ गीत व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. एम.बी.बी.एस. राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस. एस.) २०१८ आणि २०१९ बॅचच्या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते. कॉलेजच्या आवारात आणि जवळपासच्या स्थानिक भागात एकूण २५ रोपे लावण्याचे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. एकामागून एक विद्यार्थ्यांनी रोपे लावून वनसंवर्धनाचे काम केले.

# मुंबई 'ग्रीनथॉन' स्पर्धेत झळकले डेरवणचे खेळाडू

दि. १२ जून २०२२ रोजी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथे आयोजित केल्या गेलेल्या 'ग्रीनथॉन' स्पर्धेत डेरवणच्या खेळाडूंनी वर्चस्व नोंदविले. पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केल्या गेलेल्या 'ग्रीनथॉन' स्पर्धेला खेळाडूंचा विक्रमी प्रतिसाद मिळाला होता. सहा वयोगटात मुले आणि मुलींसाठी आयोजित केलेल्या या स्पर्धेत आठ हजारांहून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. अतिशय चुरशीच्या झालेल्या विविध वयोगटाच्या स्पर्धांमध्ये एसव्हीजेसीटीच्या संकुलात सराव करणाऱ्या खेळाडूंनी बाजी मारली. प्रशिक्षक अविनाश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डेरवणच्या सिंथेटिक ट्रॅकवर खेळाडूंचा संघ नियमित सराव करतो आणि विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत असतो. 'ग्रीनथॉन' स्पर्धेतील विजेते खालीलप्रमाणे :

१० वर्षांखालील मुले (१ कि.मी. धावणे)
आयुष चव्हाण - तृतीय क्रमांक

१२ वर्षांखालील मुले (२ कि.मी. धावणे) -
करण चौधरी - प्रथम क्रमांक
सुजल जोशी - तृतीय क्रमांक

१२ वर्षांखालील मुली (२ कि.मी. धावणे)-
हुमेरा सय्यद - प्रथम क्रमांक

१४ वर्षांखालील मुली (४ कि.मी. धावणे)-
तनया धूमक - द्वितीय क्रमांक

१८ वर्षांखालील मुले (५ कि.मी. धावणे)-
स्वराज जोशी - प्रथम क्रमांक
मुली (५ कि.मी. धावणे) -
खुशी हसे - प्रथम क्रमांक

सातत्याने मिळणारे आधुनिक प्रशिक्षण आणि सिंथेटिक ट्रॅक, व्यायामशाळा आणि जलतरण तलाव या सर्वांचा फायदा येथील खेळाडूंना मिळत आहे आणि त्यामुळेच येथील खेळाडू आता विविध स्पर्धांमध्ये आपली ओळख निर्माण करीत आहेत. पश्चिम महाराष्ट्रापासून ते अगदी मराठवाडा येथूनही खेळाडू येथील क्रीडासंकुलात येऊन सराव करतात. उदयोन्मुख खेळाडूंना त्यांच्या वाटचालीतील खडतर अशा सुरुवातीच्या काळासाठी डेरवणचे मैदान हे हक्काचे झाले आहे. स्वतः खेळाडू असलेला आणि आता प्रशिक्षक म्हणून नावारूपाला आलेला अविनाश पवार हा नक्कीच येथील खेळाडूंच्या भविष्याला दिशा देईल अशा भावना ज्येष्ठ क्रीडा संघटक संदीप तावडे यांनी विजेत्या खेळाडूंना शुभेच्छा देताना व्यक्त केल्या.





मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०